




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज

• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड–महाराष्ट्र | शनिवार दि.१८ एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक ३० | पाने ४ | पान १ | किंमत ३ रूपये








RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com










## मस्साजोग येथे सरपंच पदासाठी...

# अश्विनी देशमुख-स्वरूपानंद देशमुख यांच्यात लढत

केज । प्रतिनिधी

**मस्साजोग (ता.केज) येथील ग्राम पंचायतीच्या सरपंच पदासाठी स्व. संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांच्या विरोधात स्वरूपानंद देशमुख यांनी उमेदवारी अर्ज ठेवल्याने आता त्यांच्यामध्ये सरळ लढत होत आहे. त्यामुळे आता मतदार कोणाच्या बाजूने कौल देणार? हे निकालानंतर स्पष्ट होणार आहे.**

मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण करून निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. त्यामुळे रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी पोटनिवडणूक जाहीर झाल्यानंतर स्व. संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना बिनविरोध काढण्याचा विचार ग्रामस्थांतून केला जात होता. मात्र उमेदवारी अर्ज भरण्यास सुरूवात झाल्यानंतर स्व. संतोष देशमुख यांच्या विरोधात नऊ मतांनी पराभूत झालेले स्वरूपानंद देशमुख यांनी उमेदवारी अर्ज भरून निवडणूक लढणार असल्याचे जाहीर केले होते. त्यात आणखी संजीवनी देशमुख, पंजाब देशमुख, करुणा स्वरूपानंद देशमुख या तिघांचे उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या १७ एप्रिल पर्यंत निवडणूक बिनविरोध होण्याच्या आशा होत्या. मात्र स्वरूपानंद देशमुख यांनी उमेदवारी अर्ज ठेवल्याने व इतर तिघांनी अर्ज काढून घेतल्याने ही निवडणूक होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. अश्विनी देशमुख व स्वरूपानंद देशमुख यांच्यात ही लढत होत असून मतदार आता कोणाच्या बाजूने कौल देतात? याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



## बीड नगराध्यक्ष,स्वच्छता सभापती यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून...

# राजीनामा द्यावा-जोगदंड

बीड । प्रतिनिधी

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती प्रसंगी काढण्यात येणाऱ्या मिरवणूक मार्गावर घाण पाणी सोडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या व समाज बांधवांना रस्त्यावर बारीक चरखडी टाकून जखमी करण्यास कारणीभूत असलेल्या नगर परिषद अधिकाऱ्यासह बीड नगर परिषद नगराध्यक्षा प्रेमलता पारवे व स्वच्छता सभापती शेख निजाम यांनी याप्रकरणी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा अशी मागणी रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी केली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मिरवणुकी दरम्यान घाणपाणी सोडून आंबेडकरांचा अवमान करण्यास नगर परिषद अधिकाऱ्यांसह नगराध्यक्षा व स्वच्छता सभापती सुद्धा तितकेच जबाबदार आहेत. बीड नगर पालिकेचा निष्काळजीपणा जयंती उत्सवाला गालबोट लावणारा आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती प्रसंग घडलेल्या



### भीम जयंतीत न.प.चे गलिच्छ राजकारण

सर्व घटनांना नगर परिषद प्रशासन नगराध्यक्ष व स्वच्छता सभापती जबाबदार आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती उत्सवात आंबेडकरी अनुयायांना वेठीस धरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमानास कारणीभूत असणाऱ्या नगराध्यक्ष प्रेमलता पारवे व स्वच्छता सभापती शेख निजाम यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड,मझरखान, अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, महेश आठवले, श्याम वीर, विलास जोगदंड, संभाजी गायकवाड, सिद्धीक फारोकी, अक्षय कोकाटे, महेंद्र वडमारे, सचिन वडमारे, भैय्या साळवे, भैय्या मस्के, पप्पू वाघमारे, आप्पा मिसळे, संजय हनवते आदींनी केली आहे.

# गोवंशाची सुटका; आरोपीला बेड्या!



अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात कत्तलीच्या उद्देशाने अत्यंत निर्दयतेने नेल्या जाणाऱ्या गोवंशाची पोलिसांनी धाड टाकून सुटका केली आहे. गुरुवारी दुपारी दीड वाजेच्या सुमारास बुरूज तलावासमोर ही कारवाई करण्यात आली असून या प्रकरणी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली आहे. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांना एका वाहनातून गोवंशाची कत्तलीसाठी अवैध वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून एमएच २५ एजे ६५८६ क्रमांकाचे वाहन अडवले असता त्यात तीन जर्सी गायी आणि एक गोरा अशा चार जनावरांना ▶▶ पान २ वर

# परळीत रेल्वे पोलीस कर्मचाऱ्याची आत्महत्या

परळी । प्रतिनिधी

परळी येथील रेल्वे पोलीस कर्मचाऱ्याने आपले जीवन संपवल्याची धक्कादायक घटना आज सकाळी उघडकीस आली आहे. धक्कादायक म्हणजे रेल्वे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या छळाला कंटाळून त्यांनी टोकाचा निर्णय घेतल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. त्यांनी हा निर्णय का घेतला त्याचे अद्याप ठोस कारण समोर आलेले नाही. या घटनेची कसून चौकशी सुरु आहे. नितीन पंडित ढगे असे मृत कर्मचाऱ्याचे नाव असून, या घटनेमुळे पोलीस दलात प्रचंड खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नितीन ढगे हे परळी रेल्वे पोलीस दलात कार्यरत होते. सदर घटना आज सकाळी ७ ते ८ वाजेच्या सुमारास घडली. त्यांनी परळी येथील, माधव बाग परिसरात राहत्या घरी टोकाचे पाऊल उचलून दोरीने गळफास घेत आत्महत्या केली. ही घटना समोर येताच परिसरात हळहळ



### नितीन ढगे असे मृताचे नाव

व्यक्त केली जात आहे. नितीन ढगे यांनी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या मानसिक त्रासाला कंटाळून हे पाऊल उचलल्याची प्राथमिक चर्चा पोलीस वर्तुळात रंगली आहे. पोलीस दलातील वाढता ताण आणि अंतर्गत जाच यामुळे एका तरुण कर्मचाऱ्याचा बळी गेल्याची भावना व्यक्त होत आहे. सदर घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी परळी येथील उपजिल्हा रुग्णालय येथे पाठवण्यात आला आहे. शवविच्छेदन अहवाल समोर आल्यास पोलिसांना तपासाला नवीन दिशा मिळण्याची शक्यता आहे. या प्रकरणी अधिकृत तक्रार दाखल झाल्यानंतर किंवा सुसाईड नोट ▶▶ पान २ वर

# मुंबईत आज युवाशक्तीचा महासंगम



### युवासैनिक मोठ्या संख्येने सहभागी होणार–विपुल बाळासाहेब पिंगळे

बीड । प्रतिनिधी

राज्यभर युवासेनेची संघटनात्मक ताकद अधिक भक्कम करण्यासाठी आणि नव्या तरुण नेतृत्वाला व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी युवासेनेचे वार्षिक संमेलन महायुवोत्सव २०२६ शनिवार, १८ एप्रिल रोजी मुंबईतील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी येथे भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आले आहे. सकाळी १०.०० ते सायं. ५.०० या वेळेत हा महायुवोत्सव पार पडणार असून, राज्यभरातून सुमारे १५ हजार युवक सहभागी होणार आहेत. या संदर्भात ▶▶ पान २ वर

# दहा लाखाचा गुटखा पकडला

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यात मस्साजोग शिवारात असलेल्या एका पत्र्याच्या शेडवर केजचे सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम यांच्या पथकाने छापा मारून शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये साठवून ठेवलेला दहा लाख रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. या प्रकरणी गुटखा माफिया विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. मस्साजोग ता. केज येथील रोहित आसाराम देशमुख याने काळेगावघाट रस्त्या वरील रंजीत ▶▶ पान २ वर






# साळेगाव येथे धाडसी घरफोडी

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील साळेगाव येथे मध्यरात्री घराच्या पाठीमागील गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश करून बेडरूमचे कुलूप तोडून चोरट्यांनी पेटीसह आतील नगदी दीड लाख रु. रोख रक्कम आणि ६८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने याची चोरी करून धाडसी घरफोडी केल्याची घटना घडली आहे. घटनास्थळी तसेच ठसे तज्ञ आणि शानपथकांनी भेट देऊन चोरीचा तपास सुरू केला आहे. केज तालुक्यातील साळेगाव येथील दत्ता तोंडे यांच्या साळेगाव येथील राहत्या घरी दिनांक १८ एप्रिल रोजी मध्यरात्री दोन वाजवण्याच्या सुमारास अज्ञात चोरटाने घराच्या ▶▶ पान २ वर

# गणपत डोईफोडे यांनी मांडला पिंपळनेरच्या जिव्हाळ्याचा प्रश्न

### दोन दिवसात गावठाण फिडरचा प्रश्न मार्गी लावण्याचे अभियंता यांचे आश्वासन

पिंपळनेर । प्रतिनिधी

पिंपळनेर येथे आज छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिराचे समाधान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिवबिराला सर्व विभागाचे अधिकारी कर्मचारी तहसीलदार यांची उपस्थिती होती यावेळी माजी जिप सदस्य गणपत डोईफोडे यांनी पिंपळनेर करांचा महत्वाचा असणारा गावठाण फीडर चा प्रश्न अगदी पोटतिडकीने मांडला असता उपस्थित असणारे पिंपळनेर महावितरणचे अभियंता कसबे यांनी दोन दिवसात मार्गी लावण्याचे आश्वासन दिले असून यामुळे आता गावच्या लाईटचा प्रश्न कायमचा सुटणार आहे गणपत डोईफोडे ▶▶ पान २ वर




जाहीर प्रगटन

ZUM ZUM

## सावधान

झमझम इंडस्ट्रीज बीड ही आपल्या झमझम या थंडपेय उत्पादनाचा व्यवसाय करते. ही कंपनी थंडपेयाच्या रिकाम्या बाटल्या किंवा प्लास्टीक क्रेटची विक्री करत नाहीत. बाजारात अशा रिकाम्या बाटल्या खरेदी व विक्री करून त्याचा दुरुपयोग करून कंपनीस बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे. अशा प्रकारे रिकाम्या बाटल्या व क्रॅटची खरेदी व विक्री करणे हे कायदेशीर दृष्टया गैर आहे. 'झमझम'ची उत्पादनाची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांनीही याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जुने साहित्य (भंगार) खरेदी–विक्री करणाऱ्यांनीही झमझमच्या रिकाम्या बाटल्या अथवा क्रॅटची खरेदी विक्री करणाऱ्यांनीही झमझमच्या रिकाम्या बाटल्या अथवा क्रॅटची खरेदी– विक्री व्यवहार करू नये किंवा त्यास सहकार्य करू नये. असे कोठेही आढळल्यास झमझम इंडस्ट्रीज त्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करील व त्याच्या परिणामाची जबाबदारी संबंधितावर राहील याची सूचना देण्यासाठीच हा सावधानतेचा इशारा दिला आहे. याची नोंद घ्यावी.

प्रगटन देणार

**झमझम इंडस्ट्रीज**

झमझम कॉलनी,बीड

# महिला सक्षमीकरण विकासाच्या दिशेने पुढचे पाऊल



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मी कोणत्याही समाजाची प्रगती त्या समाजातील महिलांनी केलेल्या प्रगतीवरून मोजतो हे जागतिक कीर्तीचे विधान केले होते. २० जुलै १९४२ रोजी नागपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय दलित महिला परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणात हे उद्गार काढले होते. आज २०२६ या वर्षातही या क्रांतीकारी वाक्याच्या सत्यतेची आपल्याला पदोपदी अनुभूती येत आहे. भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून भारतीय महिलांना शिक्षित होण्याची, आर्थिक संपन्न होण्याची, संघटित होण्याची आणि आत्मसन्मानाने जगण्याचा हक्क दिलेला आहे. यामाध्यमातून महिलांनी शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, क्रीडा, राजकारण आणि उद्योग या सर्व क्षेत्रांमध्ये आपली छाप उमटवली आहे. महिलांनी विविध क्षेत्रात त्यांच्या कतृत्वाचा ठसा उमटविला आहे. तरी आजही महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, जसे की लिंगभेद, अत्याचार, बालविवाह, आणि शिक्षणातील असमानता. या समस्यांवर मात करण्यासाठी सरकार, समाज आणि प्रत्येक व्यक्तीने एकत्र येऊन प्रयत्न करणे आवश्यक आहे. महिलांनी आपल्या हक्कांबद्दल जागरूक होणे, आर्थिक स्वावलंबी होऊन स्वतःच्या पायावर उभ्या राहणे आवश्यक आहे. त्यामुळे महिला या समाजात सन्मानाने जीवन जगू शकतात. ज्या समाजात महिलांना समान हक्क, संधी आणि सन्मान मिळतो तो समाज अधिक विकसित आणि सुसंस्कृत मानला जातो. महिला सक्षम झाली तरच कुटुंब, समाज परिणामी देश अधिक सक्षम होण्यास मदत होते. महाराष्ट्र शासनाने वेळोवळी महिलांसाठी विविध योजना प्रत्यक्ष अंमलात आणून महिला सक्षमीकरणच्या माध्यमातून राज्याच्या विकासासाठी पाऊल टाकले आहे. नारी शक्ती ही केवळ एक संकल्पना नसून ती समाजाच्या प्रगतीचा मुख्य आधार आहे. यासाठी शासन मुलींच्या जन्मापासून ते वृध्द /निराधार महिलांच्या मदतीसाठी विविध विभागांमार्फत विविध योजनांची अमंलबजावणी करीत आहे. यामध्ये महिला आणि बालविकास विभागामार्फत महिला सक्षमीकरण, आरोग्य आणि बाल कल्याणासाठी अनेक योजना राबवल्या जातात. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' पात्र महिलांना आर्थिक सहाय्य (मासिक १५००रू.), 'सुकन्या योजना' मुलींचा जन्मदर वाढवण्यासाठी आणि बालविवाह रोखण्यासाठी या योजनेत मुलींच्या नावे ५० हजार रूपयांची मुदत ठेव(ऋऊ) केली जाते., 'एकात्मिक बाल विकास सेवा योजना (खउऊड)' या योजनेत ० ते ६ वर्षे वयोगटातील मुले, गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांना पोषण आहार, लसीकरण व आरोग्य तपासणी, 'मिशन वात्सल्य' या योजनेत अनाथ बालके, बेघर मुले आणि संकटात सापडलेल्या बालकांचे संरक्षण व पुनर्वसन करण्यात येते, आणि 'वन स्टॉप सेंटर' (सखी केंद्र) हिंसाचारग्रस्त महिलांना पोलीस मदत, वैद्यकीय साहाय्य, कायदेशीर सल्ला आणि तात्पुरता निवारा एकाच छताखाली मिळवून देणे. किशोरी शक्ती योजना( किशोरवयीन मुलींचे आरोग्य, पोषण आणि शिक्षणासाठी ), महिला किसान योजना( महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी), महिला आर्थिक विकास महामंडळ (महिलांना स्वयंरोजगारासाठी अनुदान आणि कर्ज सुविधा) यांचा समावेश आहे. या विविध योजनांद्वारे आर्थिक साहाय्य, पोषण, शिक्षण आणि संरक्षण पुरवले जाते. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' मोहिमेअंतर्गत सुकन्या समृध्दी योजना सुकन्या समृद्धी योजना (डडध) ही भारत सरकारची मुलींच्या शिक्षण आणि लग्नासाठी (शिक्षण व विवाहास मदत) अल्प बचत योजना आहे. मनोधैर्य योजना (अत्याचारित महिला व बालकांना कायदेशीर व आर्थिक मदत). कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाद्वारे महिलांच्या नेतृत्वाखालील स्टार्टअप्सना आर्थिक पाठबळ देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप ही महत्त्वपूर्ण योजना राबवली जाते. अशा प्रकारे विविध योजना शासन राबवित आहे. महिला सक्षमीकरणासाठी शासनाच्या योजना म्हणजे महिलांना त्यांच्या जीवनातील स्व्तःच्या पायावर उभे राहण्यासाठी, त्यांना स्वतः चे निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे होय. त्यामुळे महिला सक्षमीकरण हे केवळ महिलांसाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. नारीशक्ती हीच खरी राष्ट्रशक्ती आहे. महिलांना सशक्त करणे म्हणजे खऱ्या अर्थाने देशाचा सर्वांगीण विकास करणे होय.

**रेखा पालवे–गायकवाड**
उपसंपादक : विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

# बीडमध्ये उद्या सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या भीमगीतांचा भव्य कार्यक्रम

## मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संयुक्त जयंती निमित्त उद्या दि. १९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या भीमगीतांचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली होणार असून, या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या भीमगीतांच्या कार्यक्रमांतून नागरिकांना सामाजिक प्रबोधन आणि सांस्कृतिक आनंदाचा अनुभव घेता येणार आहे.आमदार संदीप क्षीरसागर यांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांची भीमगीते समाजाला प्रेरणा देणारी आणि जागृती निर्माण करणारी आहेत. या कार्यक्रमात सहभागी होऊन आपण सर्वांनी सामाजिक एकता आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा संदेश पुढे न्यावा, असे आ.क्षीरसागर यांनी म्हटले आहे. हा कार्यक्रम बीडमधील सर्व वयोगटातील नागरिकांसाठी खुला असून, मोठ्या उत्साहात त्याचे आयोजन करण्यात येत आहे. उपस्थितांना भीमगीतांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या विचारांचा आणि कार्याचा गौरव अनुभवता येईल, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.



# मराठवाडा 'विशेष आपदाग्रस्त क्षेत्र' म्हणून घोषित करा

## बळीराजासाठी खा.बजरंग सोनवणे दिल्लीत कृषीमंत्र्यांची भेटीला

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा आणि विशेषत: बीड जिल्ह्यातील शेतकरी सध्या निसर्गाच्या लहरीपणामुळे आणि आर्थिक संकटांमुळे मोठ्या विवंचनेत आहे. या पार्श्वभूमीवर, खा.बजरंग सोनवणे यांनी दि.१७ रोजी नवी दिल्ली येथे केंद्रीय कृषी एवं किसान कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांची प्रत्यक्ष भेट घेतली. जिल्ह्यातील गंभीर कृषी परिस्थितीवर सविस्तर चर्चा करून त्यांनी



मराठवाडा विशेष आपदाग्रस्त क्षेत्र म्हणून घोषित करा, अशी मागणी पत्राद्वारे केली. खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे, गेल्या अनेक वर्षांपासून मराठवाडा दुष्काळ, अतिवृष्टी आणि अवकाळी पावसाच्या सततच्या संकटांना सामोरे जात आहे. यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बिकट झाली असून अनेक शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले गेले आहेत. या प्रश्नांचे गांभीर्य लक्षात घेऊन केंद्र सरकारने तातडीने मदत करावी, अशी मागणी केली. यासोबतच मराठवाडा व बीड जिल्ह्याला तातडीने 'विशेष आपदाग्रस्त क्षेत्र' म्हणून घोषित करावे. पिकांच्या नुकसानीची रक्कम कोणतीही मध्यस्थी न ठेवता थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, पंचनामे वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी करावी, विमा योजनेतील 'ट्रिगर पॉइंट' पुन्हा लागू करून वास्तव नुकसानानुसार सुलभ प्रक्रियेद्वारे भरपाई द्यावी. पिकांना 'उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा' या सूत्रावर आधारित हमीभाव निश्चित करावा, मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेली १७,००० रुपये प्रति हेक्टर मदत बीड जिल्ह्यात तात्काळ वितरित करावी, शेतकरी कर्जावरील व्याजमाफी आणि पुनर्गठनासाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे, अशी मागण्या केल्या आहेत. या भेटीमुळे मराठवाडा आणि विशेषत: बीड जिल्ह्यातील शेती प्रश्नांवर आता केंद्र सरकार काय भूमिका घेणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे

पान १ वरून

### मुंबईत आज...

वरळी येथे आयोजित पत्रकार परिषदेत युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांनी माहिती दिली की, शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथ शिंदे आणि युवा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या नेतृत्वात हा महायुवोत्सव संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार असून, याचवेळी युवासेनेच्या अधिकृत वेबसाइटचे अनावरण करण्यात येणार आहे. तसेच सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ आणि युवासेनेचे नवीन प्रेरणादायी गीतही या मंचावरून प्रदर्शित केले जाणार आहे. युवकांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा, संघटन विस्तार, नेतृत्व विकास, सामाजिक बांधिलकी आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी नव्या दिशा ठरवण्याचा संकल्प या मंचावरून व्यक्त केला जाणार आहे. हा महायुवोत्सव युवकांना नवी ऊर्जा, प्रेरणा आणि दिशा देणारा ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. या मेळाव्यास बीड जिल्हा सह मराठवाड्यातील युवासेना पदाधिकारी, युवासैनिक आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा युवासेना मराठवाडा विभागीय निरीक्षक विपुल बाळासाहेब पिंगळे यांनी दिली. मराठवाडा विभागातील जिल्हाभरात बैठका, नियोजन आणि जनजागृती मोहीम राबवून मोठ्या उपस्थितीसाठी तयारी सुरू आहे. बीड जिल्ह्यातील व मराठवाड्यातील युवकांमध्ये या महायुवोत्सवाबाबत मोठा उत्साह असून, गावागावांतून युवक सहभागी होण्यासाठी पुढाकार घेत आहेत. मोठ्या संख्येने सहभागी होऊन युवाशक्तीचा बुलंद आवाज राज्यभर पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, गृहराज्यमंत्री योगेश कदम, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार धैर्यशील माने, खासदार ज्योतीताई वाघमारे यांच्यासह शिवसेनेचे मंत्री, वरिष्ठ नेते व पदाधिकारी उपस्थित राहून युवकांना मार्गदर्शन करणार आहेत. प्रगतीशील, सक्षम आणि युवकप्रधान महाराष्ट्र घडविण्यासाठी हा महायुवोत्सव एक ऐतिहासिक टप्पा ठरेल, असा विश्वास युवासेना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

### परळीत रेल्वे...

मिळाल्यास आत्महत्येचे नेमके कारण स्पष्ट होईल. दरम्यान, या घटनेमुळे लोहारा तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात संताप व्यक्त होत असून चौकशीची मागणी केली जात आहे.

### गोवंशाची सुटका...

चारा-पाण्याशिवाय अत्यंत क्रूरपणे कोंबून ठेवल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी ३ लाख ४३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून धाराशिव जिल्ह्यातील हिवरा येथील ५२ वर्षीय आरोपी दशरथ शंकर जगदाळे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा आणि महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियमांतर्गत ही कारवाई करण्यात आली असून पोलीस हवालदार अमोल गायकवाड या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### गणपत डोईफोडे...

यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. पिंपळनेर गावठाण फीडर लवकर कार्यान्वित व्हावे ही सर्व गावकऱ्यांनी अनेक वेळा भावना व्यक्त केली मात्र काम पूर्णत्वास गेलेले असतांना नेमकी माशी कुठे शिंकली कळेना त्यामुळे व्यापाऱ्यांना आणि नागरिकांना उन्हाळ्यात अंगाची लाही लाही होत आहे व्यापारी त्रस्त आहेत परंतु काम कुठे थांबले हे कोणालाच कळेना नुसती चर्चा होत असताना अचानक आज समाधान शिबिरात मात्र गणपत डोईफोडे यांनी हा मुद्दा चर्चेत आणल्याने समाधान नागरिकांनी व्यक्त केले आणि हे फीडर कधी कार्यान्वित होणार यावर प्रश्न उपस्थित करताच दोन दिवसात प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन अधिकारी यांनी दिले. त्यामुळे गावच्या लाईटचा प्रश्न दोन दिवसात सुटेल ` की अजून कालावधी लागेल हे पाहणे गरजेचे आहे.

### दहा लाखाचा...

बाजीराव देशमुख यांच्या शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये राज्यात विक्री, सेवन आणि वाहतुकीस बंदी असलेला गुटख्याचा साठा करून ठेवल्याची गुप्त माहिती सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम यांनी मिळाली. माहिती मिळताच सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकटराम यांनी त्यांच्या पथकाला कारवाईचे आदेश दिले, आदेश मिळताच सहाय्यक पोलिस अधीक्षकांच्या पथकातील पोलिस उपनिरीक्षक जावेद कराडकर, पोलिस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार, जमादार बालासाहेब डापकर, विकास चोपणे, धोंडीराम मोरे, विशाल क्षीरसागर, आशपाक इनामदार यांच्या पथकाने १७ एप्रिल रोजी दुपारी २:०० वाजता अचानक मस्साजोग शिवारातील पत्र्याच्या शेडवर छापा मारला. पत्र्याच्या शेडची झडती घेतली असता त्या मध्ये पांढऱ्या, निळ्या, गुलाबी रंगाच्या पोत्यासह पिशव्या व खोक्याध्ये महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला व राज्यात प्रतिबंधीत केलेला गुटखा सुगंधीत तंबाखु व पान मसाला मिळून आला. पोलिसांनी दहा लाख रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. पोलिस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार यांच्या फिर्यादी वरून रोहित देशमुख याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तर रोहित देशमुख हा फरार झाला आहे. दोन दिवसा पूर्वी गुटखाफियाने केला होता एका शिक्षकावर खुनी हल्ला :- आमच्या गुटखा तस्करीचा माहिती पोलिसांना दिल्याने आमचे नुकसान झाले. या संशया वरून केजमध्ये १४ एप्रिल रोजी मोसिन केरेशी या प्राथमिक शाळेच्या शिक्षकाला मुजाहीद खैरूमिया खुरेशी आणि आबुजर खैरुमिया खुरेशी या दोघा गुटखा माफियाने फायटरने मारहाण करून जखमी करून जीवघेणा हल्ला केला होता. गुटखा माफियावर कठोर कारवाई करून त्यांच्यावर मकोक्का अंतर्गत कारवाई करण्याची मागणी फिर्यादीने केली होती. त्या नंतर पोलिस सतर्क झाले आहे मसाजोग येथे त्यांनी गुटख्याच्या साठ्यावर छापा मारला.

### साळेगाव येथे...

मागील बाजूचे लोखंडी गेटचे कुलूप तोडून बेडरूमचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्या नंतर चोरट्यांनी बेडरूमच्या कपाटात ठेवलेले दीड लाख रु. व लोखंडी पेटीतील सोन्याच्या एकूण ग्रॅम वजनाच्या पाच अंगठ्या, सोन्याची चैन, पुतळ्या आणि सेवन पीस असे सर्व मिळून ६८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि शेत माल विक्रीचे दीड लाख रु असा एकूण मुद्देमाल लंपास केला. चोरट्यांनी लोखंडी पेटी घेऊन घरच्या शेजारी असलेल्या शेतातील एका ओढ्याजवळ जाऊन पेटी उघडून त्यातील कपडे टाकून दिले. तसेच रिकामी पेटी तेथेच टाकून पोबारा केला. तसेच घरातील कपाट असलेले सामान, दागिन्यांचे रिकामे डब्बे घरात इतस्ततः विखुरले. चोरट्यांच्या आवाजाने दत्ता तोंडे यांची वृद्ध आई गवळण बाई तोंडे यांनी त्यांच्या सून झालेल्या खोलीत आवाज दिला मात्र चोरट्यांनी त्यांच्या खोलीला बाहेरून कडी लावली होती. त्या नंतर गवळणबाई यांनी घरा शेजारी असलेल्या गोठ्यात त्यांच्या नातवांना पळत जाऊन उठविले आणि चोरटे घरात शिरल्याची माहिती दिली. ते घरात येई पर्यंत चोरट्यांनी सर्व ऐवज लुटून नेला होता. या घरफोडी प्रकरणी दत्ता तोंडे यांचा मुलगा सुरज तोंडे यांनी केज पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध तक्रार दाखल केली आहे. या घरफोडी प्रकरणी दत्ता तोंडे यांचा मुलगा सुरज तोंडे यांनी केज पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध तक्रार दाखल केली आहे.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# नूतन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी कार्यभार स्वीकारला

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर विभागाचे नूतन विभागीय आयुक्त म्हणून जी. श्रीकांत यांनी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्याकडून आज पदभार स्वीकारला. श्री. पापळकर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तसेच पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, अपर आयुक्त प्रताप काळे, अपर आयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, अपर आयुक्त दादासाहेब वानखेडे, अपर आयुक्त सुषमा देसाई, अपर आयुक्त मंजुषा मिसकर, सहआयुक्त राजेश काटकर, सहायक आयुक्त मंजुषा कापसे, सहआयुक्त देविदास टेकाळे, उपायुक्त सविता हरकर, महानगर नियोजनकार हर्षल बाविसकर, उपमहानगर नियोजनकार रवींद्र जायभाये, सहायक आयुक्त शुभांगी आंधळे, उप मुख्य लेखाधिकारी साधना बांगर यांच्यासह प्रादेशिक विभागप्रमुख उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री. श्रीकांत यांनी विभाग प्रमुखांशी संवाद साधत मराठवाड्यातील शेती, टंचाईस्थिती तसेच सामाजिक विषय व प्रशासकीय विषयाबाबत माहिती जाणून घेतली. सर्वांनी समन्वयाने काम करून विकास साधूया, असे आवाहन त्यांनी केले. छत्रपती संभाजीनगर विभाग हा सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचा विभाग असून, पर्यटन विकासाला चालना देतानाच शिक्षण, आरोग्य, महत्वपूर्ण उपक्रम व रोजगाराभिमुखतेवर भर देण्यात येईल, असे त्यांनी नमूद केले. तसेच विभागाला सर्वांगिण विकासाच्या दिशेने नेऊन राज्यात अग्रस्थानी आणण्याचा मनोदय त्यांनी



व्यक्त केला. नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासोबतच कामकाजात तंत्रज्ञानाचा अधिक वापर करून ई-ऑफिस प्रणालीचा १०० टक्के अवलंब करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशासकीय कामकाजात अंतर्गत समन्वय अत्यंत महत्त्वाचा असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. श्री. श्रीकांत हे २००९ च्या यूपीएससी बॅचचे अधिकारी असून त्यांनी परभणी येथे परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केला. त्यानंतर किनवट येथे सहायक जिल्हाधिकारी म्हणून प्रथम नियुक्ती झाली. नांदेड-वाघाळा महानगरपालिका आयुक्त, सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला व लातूर जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर येथील जीएसटी सहआयुक्त तसेच महानगरपालिका आयुक्त या पदांवर त्यांनी उल्लेखनीय कामगिरी

# कवडगाव येथे वैराग्य महामेरु श्री संत गोरोबाकाका यांची पुण्यतिथी साजरी

**कवडगाव । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील कवडगाव ,(बु) येथे श्री संत वैराग्यमूर्ती महामेरू व संत परीक्षक गोरोबाकाका यांची पुण्यतिथी मोठे उत्साहात व भक्तीमय वातावरणात संपन्न झाली. या पुण्यतिथी उत्सवानिमित्त गावातील भजनी मंडळांनी सकाळी १०ते १२ या वेळेत संगीत भजन आयोजित करण्यात आले होते. या भजन संध्या मध्ये भक्ती पर व विनवणी पर भगवंताचे गुणगान गाणारे अभंग गायले तसेच दुपारी बरोबर १२ वाजता सर्वांनी श्री संत गोरोबा काका यांच्या प्रतिमेवर पुष्प व अक्षदा उधळून पुण्यतिथी उत्सव साजरा केला. शेवटी



जमलेल्या सर्व भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या पुण्यतिथी उत्सवाला गावातील हभप चोले महाराज ह भ प बबन महाराज शिंदे,पखवाज वादक ह भ प महादेव महाराज पवळ ,कांता महाराज मुंडे, श्रीहरी महाराज मुंडे, बजरंग महाराज चव्हाण, दत्ता महाराज लेंडाळ, बाबु जोगदंड,आश्रुबा शेजाळ, बाबरे महादेव, बाबासाहेब रासवे, जगन काळे,शुभम उंडाळकर, अशोक उंडाळकर, डॉ.महादेव करडकर, वडवणी तालुका अध्यक्ष बळीराम करडकर यांच्यासह गावातील माता भगिनी भजनी मंडळ व बालगोपाळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कवडगाव येथील कुंभार समाज बांधवांनी पुढाकार घेतला होता.

# श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जन्म जयंती निमित्त विविध संगीतमय कथा महोत्सवाचे आयोजन

## दि.५ मे ११ मे कालावधीत भाविकांनी लाभ घ्यावा ; स्व.झुंबरलाल खटोड प्रतिष्ठानचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात गेल्या २५ वर्षापासून स्व.झुंबरलालजी खटोड प्रतिष्ठानच्यावतीने अखंडीतपणे संत विचार मांडण्याचा प्रयत्न चालू असून येत्ये ५ मे ते ११ मे २०२६ या कालावधीत स्व.यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे दररोज विविध तीन सत्रामध्ये अधिक मास व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जन्म जयंती निमित्त संगीतमय कथा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. रोज सकाळी ११ ते दुपारी २ या सत्रामध्ये श्री संत ज्ञानेश्वर महाराज जीवन चरित्र कथा याचे निरुपण



ह.भ.प. साध्वी अनुराधा दिदी (पंढरपूरकर) या करणार आहेत. तर दुपारी ३ ते ६ आणि सायं.६ ते रात्री ९ या वेळेत श्री नवनाथ कथा सार याचे निरुपन उद्बोध महाराज पैठणकर हे करणार आहेत. तसेच दि.९ मे ते ११ मे या कालावधीत आधिकमास महात्म्य कथा ह.भ.प. साध्वी गीतांजलीताई झेंडे या करणार आहेत.

संपूर्ण महाराष्ट्रभर संत ज्ञानेश्वर महाराज यांची ७५० व्या जन्म जयंती निमित्त विविध कार्यक्रम आयोजित होत आहेत. याचेच औचित्य साधून व अधिक मासानिमित्त बीडकरांना संत विचार कायम स्वरुपी मनावर बिंबवावेत या करीता प्रतिष्ठान कायम प्रयत्न करीत आहे. वरील तीन्ही कार्यक्रमांना बीडकरांनी प्रतिसाद द्यावे असे आवाहन प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात येत आहे. हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे आयोजित करण्यात आला असून प्रवेश सर्व भाविकांना विनामुल्य आहे.

# बीड युवक काँग्रेसकडून जिल्हाधिकारी कार्यालयावर निवेदन; भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत तीव्र चिंता




**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा युवक काँग्रेस कमिटीच्या वतीने आज जिल्हा आढावा बैठक पार पडल्यानंतर विविध ज्वलंत प्रश्नांवर जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. विशेषतः केंद्र सरकारकडून प्रस्तावित भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत युवक काँग्रेसने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. युवक काँग्रेसचे प्रभारी इरफान पठाण आणि सह प्रभारी धीरज सोनवणे यांनी निवेदनाद्वारे सांगितले की, या करारामुळे देशातील शेतकरी, ग्रामीण अर्थव्यवस्था तसेच सर्वसामान्य जनतेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. कृषी क्षेत्रावर याचा मोठा परिणाम होणार असून, विदेशी कंपन्यांना भारतीय बाजारपेठ खुली केल्यास स्थानिक शेतकऱ्यांना स्पर्धेत टिकणे कठीण होईल, असे त्यांनी नमूद केले. निवेदनात पुढे म्हटले आहे की, कृषी उत्पादनांवरील आयात शुल्क कमी केल्यास देशांतर्गत शेतमालाच्या किमती घसरण्याची भीती असून, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होऊ शकते. तसेच, या कराराचा देशातील लघु व मध्यम उद्योगांवरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

याशिवाय, दुग्ध व्यवसायावरही संकट ओढवू शकते, अशी भीती व्यक्त करत परदेशातून आयात होणाऱ्या दुग्धजन्य पदार्थांमुळे स्थानिक उत्पादकांना फटका बसणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. सरकारने कोणताही अंतिम निर्णय घेण्यापूर्वी सर्व घटकांचा सखोल विचार करावा आणि शेतकरी व सर्वसामान्य जनतेच्या हिताचे संरक्षण करावे, अशी मागणी युवक काँग्रेसकडून करण्यात आली आहे. अन्यथा, भविष्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला. यावेळी युवक काँग्रेसचे प्रभारी इरफान पठाण, सह प्रभारी धीरज सोनवणे, बीड विधानसभा अध्यक्ष हनुमान घोडके, विजय पवार युवक काँग्रेस माजलगाव विधानसभा अध्यक्ष, हनुमंत सांगवे युवक काँग्रेस उमरगा विधानसभा अध्यक्ष, इंटक जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, अशोक केदार (शिरूर कासार), श्रीकृष्ण साळुंके, शिवाजी कोठुळे, गणेश वटारे, भीमराव कुटे, दीपक घोडके, अशोक सुरवसे, सद्दाम शेख तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यांग कल्याणासाठी नगर पालिका सदैव तत्पर

## बीड नगर पालिकेकडून ३५८ दिव्यांग लाभार्थ्यांच्या खात्यावर ७ लाख १६ हजार रूपयांचा निधी वर्ग

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर परिषदेच्या स्वउत्पन्नातून दिव्यांग कल्याणासाठी राखून ठेवलेला ५ टक्के निधी दिव्यांग लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आला आहे. नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, गटनेते फारुख पटेल, स्वच्छता सभापती शेख निजाम, सभापती आरती रंजित बनसोडे नगरसेवक अशफाक इनामदार, यांच्यासह अन्य पदाधिकारी, नगरसेवकांच्या उपस्थितीमध्ये ३५८ दिव्यांग लाभार्थ्यांना




प्रत्येकी २ हजार रूपयांप्रमाणे ७ लाख १६ हजार रूपये निधी त्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आला. बीड नगर परिषदेच्या स्वउत्पन्नातून दिव्यांग कल्याणासाठी राखून ठेवलेल्या ५ टक्के निधी मधुन चालू आर्थिक वर्ष सन २०२५-२६ माहे सप्टेंबर २०२५ अखेर १८६ लाभाथ्यर्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते. त्यांना प्रत्येकी २ हजार रूपयांप्रमाणे निधी या पुर्वीच वितरीत करण्यात आला होता. माहे मार्च २०२६ अखेर वरील लाभार्थ्या व्यतिरीक्त एकूण ३५८ लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते. या दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी २ हजार रूपयाप्रमाणे ७ लाख १६ हजार रूपये एवढा निधी संबंधितांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आला आहे.

# शाश्वत कृषी उत्पादन प्रदर्शन व विक्री तसेच आंबा व धान्य महोत्सवाला बीडमध्ये उत्साहात सुरुवात

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात ग्राहकांना नैसर्गिक, सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शाश्वत कृषी उत्पादन प्रदर्शन व विक्री तसेच आंबा व धान्य महोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव दिनांक १७, १८ व १९



एप्रिल २०२६ रोजी अमृत मंगल कार्यालय, सुभाष रोड, बीड येथे होणार असून, महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत शेतकरी स्वतः तयार केलेली उत्पादने येथे विक्रीसाठी उपलब्ध करून देणार आहेत. या प्रदर्शनात गावरान मध, मोरिंगा पावडर, गायीचे तूप, खवा-पेढे, विनापोलिश तांदूळ, नैसर्गिक गूळ, मसाले, ज्वारी चिवडा तसेच ताजे आंबे यांसारखी विविध उत्पादने ग्राहकांना पाहायला व खरेदीसाठी उपलब्ध राहतील. या उपक्रमामागील मुख्य उद्देश शेतकरी आणि ग्राहक यांच्यात थेट संवाद वाढवणे, स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देणे आणि नागरिकांना गुणवत्तापूर्ण पर्याय उपलब्ध करून देणे हा आहे.

या महोत्सवाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन शिता ॲग्रो शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड, शिरूर कासार यांच्यावतीने करण्यात आले आहे.

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ३२/२०२६**

**मोहन किसनराव डोके विरूध्द ग्रा.पं.कार्यालय, कदमवाडी**

पहा,

**मोहन किसनराव डोके रा. कदमवाडी ता.जि.बीड.**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून धारक सुमित मोहन डोके यांचा दिनांक ०४/१२/२०१३ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास कदमवाडी ता.बीड येथील जन्म- मृत्यू रजिस्टरला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कदमवाडी ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्टरला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/०४/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले

**सदर प्रकरणात पुढील तारीख ६/५/२०२६ आहे.**

शिक्का

(स्वाक्षरीत)
तहसिलदार
बीड

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ३४/२०२६**

**शशिकांत परमेश्वर वाघ विरूध्द ग्रा.पं.कार्यालय, कदमवाडी**

पहा,

**शशिकांत परिमेश्वर वाघ, रा. कदमवाडी ता.जि.बीड.**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत परमेश्वर दादाराव वाघ यांचा दिनांक २८/०४/२०१९ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास मृत्यू यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास कदमवाडी ता.बीड येथील जन्म- मृत्यू रजिस्टरला घेवुन मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन मृत्यू नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कदमवाडी ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्टरला घेवुन मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९/०४/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले

**सदर प्रकरणात पुढील तारीख ०९/०५/२०२६ आहे.**

शिक्का

(स्वाक्षरीत)
तहसिलदार
बीड

**वारस प्रमाणपत्राबद्दल जाहीर घोषणा**

**गेवराई,जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती.एस.एन.पाटील यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक :२१३/२०२६**

**आनंत विरूध्द निरंक**

ज्याआर्थी मयत नामे अंबादास रामभाऊ गंगाधर हे दिनांक १२/०१/२०१२ रोजी मौजे मालेगाव बु.ता.गेवराई जि.बीड येथे मयत झाले आहे.

**अर्जदार : १) आनंत पि.अंबादास गंगाधर वय १९ वर्षे धंदा-शिक्षण रा. मालेगाव बु.ता.गेवराई जि.बीड २) आशाबाई भ्र.अंबादास गंगाधर वय ५२ वर्षे धंदा-घरकाम रा. मालेगाव बु.ता.गेवराई जि.बीड ३) कांताबाई भ्र.अंबादास गंगाधर वय ७४ वर्षे धंदा-घरकाम रा. मालेगाव बु.ता.गेवराई जि.बीड ४) अर्चना भ्र. पांडूरंग निंबाळकर वय ३४ वर्षे धंदा-घरकाम रा. मालेगाव बु.ता. गेवराई जि.बीड**

शासकीय-निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहु मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे अंबादास रामभाऊ गंगाधर रा. मालेगाव बु.ता.गेवराई जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**पुढील तारीख : ०७/०५/२०२६**

**(मार्फत : ॲड.एस.एस.उबाळे)**

शिक्का

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गेवराई

**जाहीर प्रगटन**

**मा.श्री. व्ही. सी. जोशी, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ६००/२०२६,**

**राधाबाई भ्र. मनोहर खोड वि. निरंक**

ज्यापेक्षा मनोहर रंगनाथ खोड हे दिनांक २१.०३.२०२६ रोजी डॉ. सानप हॉस्पीटल, राजीव गांधी चौक, बीड, ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार

**१. राधाबाई भ्र. मनोहर खोड, वय ७४ वर्षे, धंदा घरकाम, रा. पारगाव सिरस, ता.जि. बीड २. रविंद्र पि. मनोहर खोड, वय ५६ वर्षे, धंदा नोकरी, रा. पारगाव सिरस, ता. जि. बीड**

अर्जदार क्रं. १ हे मयत नामे मनोहर रंगनाथ खोड यांची पत्नी असून, अर्जदार क्रं. २ हा मयताचा एकुलता एक मुलगा आहे. मयताचे आई-वडील हे फार पूर्वीच मयत झाले आहेत. या अर्जदारां व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शादीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत मनोहर रंगनाथ खोड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख ०९/०६/२०२६ आहे.**

आज दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**(ॲड. राम ज. दहिवाळ यांच्यामार्फत)**

शिक्का

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व . स्तर बीड

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार दि. १८ एप्रिल २०२६ ●

## थोडक्यात...

### जातनिहाय जनगणनेत ओबीसी जातीचा समावेश करून मुद्देनिहाय जनगणना करावी: वसंत मुंडे



परळी । प्रतिनिधी

आर एस एस च्या मनुवादी विचारसरणीमुळे केंद्रातील भाजप सरकारने ओबीसी जातीचा जनगणनेत समावेश केला नसल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला . भारत देशामध्ये जातनिहाय जनगणना ब्रिटिश सरकारने १९३१ ला चालू केली, त्यावेळेस पासून२०११ पर्यंत अनेक सरकारने जात निहाय जनगणना केली. परंतु भारत देशामध्ये ओबीसी आरक्षणा संदर्भात बीपी मंडल आयोग १९९० लागू करण्यात आले. परंतु भाजपा पक्षाचे धोरण आरक्षण विरोधी असून केंद्रातील व्ही पी सिंग सरकारचा मंडल आयोगाला विरोध म्हणून भाजपने पाठिंबा काढून घेऊन सरकार पाडले . मनमोहन सिंग पंतप्रधान असताना देशात जात निहाय जनगणना२०११ ला मुद्देनिहाय करण्यात आली. महाराष्ट्रातील देवेंद्र फडणवीस बीजेपीच्या सरकारने ओबीसीचा डाटा मुद्देनिहाय देण्यासंदर्भात वेळ काढून धोरण स्वीकारल्यामुळे दि.१२ जून२०१८ ला केंद्र सरकारला गुपित पत्र देऊन माहिती ठेवण्याचे सूचना आरएसएसच्या विचारधारेने बीजेपीच्या प्रत्येक राज्यातील सरकारला देण्यात आल्या त्यामुळे आरक्षण देण्यामध्ये संपूर्णपणे विलंब झाला. दीड टक्के जनगणनेचा डाटा न दिल्यामुळे सर्वोच्च न्यायालयात निर्णय पेंटिंग पडला. मनमोहन सिंग सरकारने ओबीसी जनगणना संदर्भात पाच हजार कोटी रुपये खर्च केला परंतु ओबीसीचा डाटा ही राष्ट्रीय संपत्ती आहे ,भारता मध्ये पशुपक्षी जनगणना होते परंतु ओबीसीची जातनिहाय जनगणना होऊन देण्यामध्ये मनुवादी भाजपा पक्षाच्या विचारसरणीचा हात आहे . संपूर्ण देशामध्ये ५२ ते ७०% टक्के पेक्षा जास्त ओबीसीची लोकसंख्या आहे. भारतामध्ये ३००० पेक्षा जास्त जाती ओबीसी विभागात असून क्रिमिनल आट रद्द करून सामाजिक शैक्षणिक आर्थिक मागासलेपणा आधारावर वर्गीकरण करून जातनिहाय ओबीसी जनगणना करण्यात यावी. ओबीसी समाज जागा झाला तर राज्यातील व केंद्रातील सरकार निवडणुकीच्या माध्यमातून बदल होऊ शकतो अशी धास्ती भाजपच्या सरकारला असल्यामुळे ओबीसी वर सतत अन्याय केला जात असल्याचा आरोप काँग्रेसने नेते वसंत मुंडेनी केला.

### देशभरात 'नारी शक्ती'चा सन्मान आणि अभिमानाचा गजर सुरू,मात्र पाटोद्यात महिलांसाठी सार्वजनिक मुतारीच नाही

पाटोदा । प्रतिनिधी

भारत देशभरात 'नारी शक्ती'चा सन्मान, महिला सक्षमीकरण आणि त्यांच्या हक्कांबाबत मोठ्या घोषणा केल्या जात असताना बीड जिल्हातील पाटोदा शहरात मात्र महिलांसाठी अत्यावश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचाच अभाव असल्याचे चित्र समोर आले आहे. बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यात पाटोदा तहसील कार्यालय परिसर, पंचायत समिती कार्यालय परिसर तसेच शहरातील महत्वाच्या ठिकाणी महिलांसाठी स्वतंत्र सार्वजनिक मुतारीची व्यवस्था नसल्यामुळे महिलांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. शासकीय कामासाठी येणाऱ्या महिला, विद्यार्थिनी तसेच नागरिकांना यामुळे अडचणींचा सामना करावा लागत असून हा प्रश्न गंभीर बनत चालला आहे.एकीकडे देशात महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना आणि निर्णय राबवले जात आहेत, महिलांच्या सन्मानाचा गजर होत आहे, मात्र पाटोद्यासारख्या ठिकाणी अजूनही मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने या घोषणांची वास्तवाशी तफावत स्पष्ट दिसून येते.या पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने लक्ष देऊन महिलांसाठी स्वतंत्र व स्वच्छ सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून व्यक्त होत आहे. महिलांच्या सन्मानासाठी केवळ घोषणा न करता प्रत्यक्षात सुविधा उपलब्ध करून देणे हीच खरी गरज असल्याचे मतही व्यक्त केले जात आहे.

### बलभीमचा खेळाडू महाराष्ट्र केसरी ग्रीकोरोमन स्पर्धेत द्वितीय

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने मा. खासदार श्री. रामदासभाऊ तडस (अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ) आयोजित वरिष्ठ ग्रीकोरोमन राज्यस्तरीय अजिंक्यपदक कुस्ती स्पर्धा तथा दुसरी ग्रीकोरोमन महाराष्ट्र केसरी किताब लढत २०२५-२६ या स्पर्धा दिनांक ३१ मार्च ते १ एप्रिल २०२६ रोजी विदर्भ केसरी पैलवान रामदासभाऊ तडस इनडोअर स्टेडियम, देवळी, वर्धा येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत बलभीम महाविद्यालयाचा खेळाडू दिनेश भागवत काकडे याने ग्रीकोरोमन ५५ किलो वजन गटात द्वितीय क्रमांक मिळवला.तसेच या खेळाडूने अंतर महाविद्यालय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले आहे तसेच अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग नोंदवला आहे. दिनेश काकडे या खेळाडूच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष उंदरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# समाधान शिबिरास पिंपळनेर मध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद

## नागरिकांना विविध सेवांचा गावातच लाभ देण्याचा जिल्हाधिकारी यांचा निर्धार

### अनेक विभागाच्या सेवा एकाच ठिकाणी लाभ घ्यावा – तहसीलदार शेळके



बीड । प्रतिनिधी

शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज अभियान अंतर्गत मंडळ विभाग पिंपळनेर अंतर्गत पिंपळनेर येथे १७ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर आयोजित करण्यात आले . या शिबिरास नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली. पिंपळनेर येथील गणपती मंदिर सभागृह येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये शेतकरी , विद्यार्थी , ग्रामस्थ तसेच विविध सामाजिक घटकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत शासनाच्या विविध सेवांचा लाभ घेतला .

राज्य शासनाने महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख , पारदर्शक व गतिमान करण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने हे अभियान सुरू केले आहे . नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवा त्यांच्या गावातच उपलब्ध करून देणे , प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करणे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव स्वतः अनेक ठिकाणी हजेरी लावत असतात . पिंपळनेर येथे आयोजित शिबिराने या उद्दिष्टांना प्रत्यक्ष स्वरूप दिल्याचे चित्र पाहायला मिळाले . या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते . कार्यक्रमास बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची प्रमुख उपस्थिती लाभली . कार्यक्रमाच्या वेळी नायब तहसीलदार वंजारे साहेब( सं गा यो ), नायब तहसीलदार संभाजी थोटे ( सं गा यो ), मंडळ अधिकारी सचिन सानप , ग्राम महसूल अधिकारी प्रशांत ढोले, अमित तरवरे, ओमसाई सोनवणे, प्रमोद कोळपकर, वनिता इंगळे यांनी शिबिराचे महत्त्व व उद्देश याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले .

सदर कार्यक्रमास पिंपळनेर येथील सरपंच मनोज (काका) पाटील, नाथापूरचे सरपंच सुंदर चव्हाण, पिंपळादेवीचे सरपंच दत्ता किवने, सुर्डी (थोट)चे सरपंच विलास मोरे, लोणीचे (शाह) उपसरपंच नानाभाऊ लोणकर , माजी जि.प. सदस्य गणपत डोईफोडे , सतिश पाटील , माजी पं. स. सदस्य राजेश गवळी, पिंपळादेवी येथील सुरेश घुमरे हजर होते . कार्यक्रमावेळी मनोज पाटील, सतीश पाटील, गणपत डोईफोडे यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त करून सदर शिबीर चा सर्वांनी लाभ घेणे बाबत आवाहन केले . तसेच कार्यक्रमास महसूल मंडळातील आजी, माजी सरपंच तसेच महसूल विभागातील व इतर विभागातील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . पिंपळनेर महसूल मंडळातील सर्व गावांचे उपसरपंच, पोलीस पाटील , ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, महसूल सेवक, महावितरण कर्मचारी , आरोग्य विभाग कर्मचारी , अंगणवाडी पर्यवेक्षिका , अंगणवाडी सेविका , आशा कार्यकर्त्या , शेतकरी गट , विद्यार्थी व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने या शिबिरात सहभागी झाले . नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला लोकाभिमुख स्वरूप प्राप्त झाले . भूमी अभिलेख अधिकारी व कर्मचारी यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यांची स्वतंत्र नोंद घेतली .

या शिबिराच्या माध्यमातून विविध विभागांचे माहितीपर स्टॉल्स उभारण्यात आले होते . महसूल विभागाशी संबंधित जमीन नोंदणी , वारस नोंद , डिजिटल सातबारा उतारे , विविध दाखले व प्रमाणपत्रे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली. नागरिकांनी आपल्या अडचणी मांडल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले . शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध सेवांचा लाभ नागरिकांना देण्यात आला . यामध्ये जिवंत सातबारा , मयत खातेदार कमी करणे , वर्ग दोन चे वर्ग एक मध्ये रूपांतर , वारस फेरफार , पाणी नोंद , नोंदणी प्रक्रिया , वसुली पावत्या , सेवा मित्र प्रमाणपत्र , प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र , पानंद रस्ते योजना , रस्त्यांच्या नोंदी , केवायसी प्रक्रिया , आधार शिबिर , लाभ योजना माहिती , अभिलेख दुरुस्ती , मोफत आरोग्य तपासणी , घरकुल मंजुरी , गायरान मंजुरी आदेश तसेच शेततळे योजनांची माहिती देण्यात आली . याशिवाय डिजिटल सातबारा उताऱ्यांचे वाटप , विविध योजनांतील प्रमाणपत्रांचे वितरण तसेच मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली . संजय गांधी निराधार योजना व श्रवणबाळ योजना लाभार्थ्यांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या . लाभार्थ्यांना हयात प्रमाणपत्र देण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे अनेक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला .

प्रास्ताविक करताना सचिन सानप यांनी नमूद केले की , गावकऱ्यांपर्यंत जाऊन आम्ही सेवा देण्याचा प्रयत्न करत आहोत . यामुळे गोरगरीब लाभार्थी यांना निश्चितच लाभ होईल . तसेच त्यांनी नमूद केले की बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी बीडला नियुक्ती झाल्यापासूनच अशा प्रकारच्या योजना सुरू केल्या होत्या . त्याचाही लाभ जनतेला मोठ्या प्रमाणात मिळालेला आहे . एकंदरीत रित्या या शिबिरास नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिल्यामुळे या शिबिराचे फलित बघायला मिळाले .

# देऊळगाव घाट येथे आ.सुरेश धस यांच्या हस्ते नवीन पुलाचे भूमिपूजन



आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील देऊळगाव घाट येथे नृसिंह मंदिराशेजारी बांधण्यात येणाऱ्या पुलाच्या कामाचे भूमिपूजन शुक्रवारी आ. सुरेश धस यांच्या हस्ते संपन्न झाले.मतदारसंघातील विकासकामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर या कामाला मंजुरी मिळाली.

सावरगाव - शेडाळा - देऊळगाव घाट - पिंपळगाव - वडगाव (प्रजिमा-६५, कि.मी. १२/००) या मार्गावर सुमारे १ कोटी ५० लाख रुपये खर्चून पुलाचे बांधकाम करण्यात येणार आहे. या पुलामुळे परिसरातील दळणवळण अधिक सुरक्षित व जलद होणार असून शेतकरी, विद्यार्थी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.पहिला जीर्ण झालेला पूल हा वाहतुकीसाठी धोक्याचा बनला होता.

याच बरोबर, देऊळगाव घाट येथे सुमारे १० लाख रुपये खर्चून सभागृह उभारण्यात येत असून त्या कामाचे देखील भूमिपूजन यावेळी करण्यात आले.या सभागृहामुळे स्थानिकांना सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होणार आहेत.तर दौलावडगाव येथे ४० लक्ष रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या नदी वरील पुलाचे लोकार्पण देखील करण्यात आले. यावेळी बोलताना आ.धस म्हणाले की, भविष्यातही मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न सुरू ठेवण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाला कृषिभूषण बाबासाहेब पिसोरे, अशोक इथापे, महेश म्हस्के, कारखेल सरपंच रघुशेठ घुले, अशोक दहातोंडे, शिवाजी थोरात,विजय दानवे, सुखदेव खकाळ, सालेवडगाव सरपंच महेश कराळे, छगन बागले, गोवर्धन ठोंबरे, आबा शिंदे, रावसाहेब शिरसाठ, घाटा पिंपरी सरपंच मोहन आमटे, नाना आमले, अजिनाथ वायभासे, मोहन मराठे, बबलू कुरेशी, एकनाथ वाणी, गोटीराम कोहोक, बाबू खान, वहाब पटेल, जलील कुरेशी, प्रवीण वाणी, अभिमन्यू परभणे, विशाल उमाप, बाळू मुळे, शरद दहातोंडे, यांच्यासह आदी ग्रामस्थ, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*माजलगाव बीड राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले हे बीड येथे आले असता त्यांनी हॉटेल सनराईजला सदिच्छा भेट दिली . यावेळी त्यांचा सत्कार करून स्वागत करताना अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष भाऊ राऊत दिसत आहेत.*

# दिंद्रुड येथे महाराजस्व शिबिरात शेकडो लाभार्थ्यांना लाभ

# जनतेची कामे करण्यासाठी प्रशासन सज्ज: तहसीलदार रुईकर



दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिराचे आयोजन महसूल प्रशासनाच्या वतीने शुक्रवारी करण्यात आले होते. या शिबिरात शेकडो लाभार्थ्यांनी आपल्या विविध कागदपत्रांचा लाभ घेतला असून प्रशासन जनतेची कामे करण्यासाठी सदैव सज्ज असल्याचे मत तहसीलदार संतोष रुईकर यांनी व्यक्त केले.

तहसीलदार संतोष रुईकर, तालुका कृषी अधिकारी गणेश बादाडे, तालुका आरोग्य अधिकारी मधुकर घुबडे, गट विकास अधिकारी ज्योत्सना मुळीक, तालुका उपाधिक्षक भुमी अभिलेख अधिकारी उध्दव सानप यांच्यासह तालुका विविध प्रशासकीय कार्यालयाचे अधिकारी या शिबिरास उपस्थित होते. या शिबिरात ३३ फेरफार, सात सात बारा दुरुस्तीचे प्रकरणे निकाली काढण्यात आले. १४७ सातबारा, १३४ ८ अ सह विविध प्रकारचे ८३ दाखले वितरित करण्यात आले, पुरवठा विभागाच्या वतीने ५५ इ शिधापत्रिका, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे ७५ स्मार्ट कार्ड, ऊसतोड १७ मजुरांची नोंदणी, ५ शेत रस्ता सातबारा नोंदी, संजय गांधी श्रावण बाळ अर्थसहाय्य योजनेच्या ६२ मंजूर प्रकरणाचे वाटप लाभार्थ्यांना करण्यात आले. एक खिडकी योजनेअंतर्गत ९६ प्रकरणे निकाली काढण्यात आले.

आरोग्य विभागाच्या वतीने आयुष्यमान भारत कार्ड वाटप करण्यात आले,

या शिबिराचे आयोजन महसूल मंडळाधिकारी फुलचंद हंगे सह दिंद्रुड ग्राम महसूल अधिकारी प्रमोद चव्हाण सह श्यामसुंदर गीते,वांगी सज्जा, लक्ष्मण सोन्नर बेलोरा सज्जा, विलास मोरे नाकलगाव सज्जा वैदेही चौरे सिमरी पारगाव सज्जा आदींनी केले होते. येथील जिल्हा परिषद शाळेतील केंद्रप्रमुख अमृत कुलकर्णी, मुख्याध्यापक मंचक सोळंके, सहशिक्षक मनोहर कटारे, पांडुरंग वाकसे, सुमंत कटारे सह शिक्षक वृंदांनी शिबिर संपन्न करण्यासाठी मेहनत घेतली.